संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# कौशल्यआधारित अभ्यासक्रम बाल्यावस्थेतच

**केंद्रीय** सांख्यिकी आयोगाने देशाच्या बेरोजगारीवर शिक्कामोर्तब केले असताना महाराष्ट्राने आपल्या राज्यात काय प्रतिक्रिया आहेत याचाही जरा अंदाज घेतला पाहिजे. गेल्या दोन वर्षापासून महाराष्ट्राच्या सर्व भागामध्ये लाखालाखाचे मोर्चे काढून याच रोजगाराचा आणि शिक्षणाचा प्रश्न ज्वलंतपणे मांडण्याचा प्रयत्न झाला. हे मोर्चे मराठा समाजाच्या आरक्षणाची मागणी करणारे असले तरी समाजातला इतका मोठा वर्ग नोकरीपासूनही वंचित राहातो. हे वास्तवदेखील त्यातून मांडले गेले आणि केंद्रीय सांख्यिकी आयोगाच्या पाहाणीत जर रोजगार कमी झाल्याचे समोर येत असेल तर याचा अर्थ स्पष्ट आहे की देशात सरकारी किंवा खाजगी नोकऱ्याच उपलब्ध नाहीत. मग अशावेळी सरकारने स्वयंरोजगाराचा पाठपुरावा केला पाहिजे. आपल्या शिक्षण पध्दतीत बदल करून ती रोजगाराभिमुख केली पाहिजे. म्हणजेच शिक्षणाचा आणि रोजगारनिर्मितीचा मेळ घालण्याचे कौशल्य राज्यकर्त्यांना दाखवता आले पाहिजे. गेल्या पाच वर्षात कौशल्यआधारित अभ्यासक्रम असा एक विशेष उपक्रम सुरु केला. परंतु त्यातूनही अपेक्षित उद्दीष्ट साध्य झालेले दिसत नाही. कारण इतक्या अचानकपणे असे अभ्यासक्रम राबवता येत नाहीत. विशेषतः शिक्षण आणि रोजगाराचा मेळ घालत असताना त्या गोष्टीचा तितक्याच गांभीर्याने काही महिने किंवा वर्षे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास झाला पाहिजे. देशाची समाजाची गरज लक्षात घेऊन कोणत्या स्वयंरोजगारांना प्राधान्य मिळू शकेल याची मांडणी झाली पाहिजे. म्हणजेच कौशल्यआधारित अभ्यास सुरु करण्यापूर्वी राज्यकर्त्यांनीच हे कौशल्य विकसित करण्याचे प्रशिक्षण घेण्याची गरज आहे असे म्हणावे लागते. वस्तुतः भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात स्वयंरोजगार ही एक देशव्यापी चळवळ झाली पाहिजे. कारण इतक्या मोठ्या लोकसंख्येला नोकऱ्या उपलब्ध होऊ शकत नाहीत. कृषीप्रधान असलेल्या या देशात एकेकाळी बारा बलुतेदार पध्दत अतिशय यशस्वी झाली होती. खरे तर त्या काळातले ते कौशल्यआधारित शिक्षणच होते. फक्त ते कोणत्याही शाळेत किंवा कॉलेजात जाऊन घेण्याची गरज भासत नव्हती. परंपरेने त्या त्या घरात विकसित होत होते.

### रोजगार आणि स्वयंरोजगार

अगदी गेल्या चाळीसवर्षाचा जरी विचार केला तरीसुध्दा शेती आणि शेतीपूरक उद्योगातून बराच मोठा रोजगार उपलब्ध झाला. मध्यंतरीच्या काळात सहकार चळवळ वेगाने फोफावली. देशाच्या ग्रामीण भागात सहकारी तत्वावर साखर कारखाने, सूतगिरण्या दूधउत्पादक संघ यासारखे उद्योगही उभे राहिले. त्याला आवश्यक असणारे मनुष्यबळ हे त्या त्या जिल्ह्यातल्या मर्यादित अशा औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हणजेच आयटीआयमधून काही प्रमाणात मिळत गेले. याशिवाय समाजाची अखंडपणे गरज भागवणारे सुतारकाम, लोहारकाम, गवंडीकाम , इलेक्ट्रीशियन आणि मग काळाप्रमाणे ड्राफ्टसमन, ऑटोमोबाईलशी संबंधित छोटे कोर्सेस, घड्याळ दुरुस्ती असेदेखील काही अभ्यासक्रम या आयटीआयमधून शिकवले गेले त्याचा अक्षरशः लाखो तरुणांना लाभ झाला. ते तरुण आपल्या आर्थिक क्षमतेमुळे महाविद्यालयीन शिक्षण किंवा उच्चशिक्षण घेऊ शकत नव्हते. अशांनी एक एक दोन दोन वर्षाचे आयटीआयमधले शिक्षण पूर्ण केले आणि नोकऱ्यांबरोबरच काहींनी स्वयंरोजगारही सुरु केले. आजही इंजिनिअरींग मेडिकलला जाण्यासाठी जेवढे उत्सुक असतात. त्यापेक्षाही जास्त विद्यार्थी आयटीआयच्या प्रवेशासाठी गर्दी करताना दिसतात. परंतु आपले राज्यकर्ते दळभद्री असल्याने त्यांना या ग्रामीण भागातील तरुणांच्या जिद्दीची आणि गुणवत्तेचीही कदर करता आलेली नाही. जिल्हा स्थानी असलेले आयटीआयचे प्रवेश मर्यादित जागांमुळे अनेकांना उपलब्ध होत नाहीत. दहा वर्षापूर्वी जिल्ह्यांप्रमाणे तालुक्याच्या ठिकाणीसुध्दा आयटीआय सुरु केले. मुलींसाठी स्वतंत्र आयटीआयची व्यवस्था झाली. परंतु तिथेसुध्दा राज्यकर्त्यांनी जे कौशल्य वापरायला पाहिजे ते वापरलेच नाहीत कारण या सर्व ठिकाणी परंपरेने चालत आलेले अभ्यासक्रम तसेच चालू ठेवले गेले आणि जागाही फारशा वाढवल्या गेल्या नाहीत. आता त्यासंदर्भात सरकारला जाग आलेली दिसते आणि यावर्षीपासून या जागा वाढवण्याचा निर्णय घेतला गेला. म्हणजे गेली चार वर्षे कौशल्य विकासाचा नुकताच घोशा लावला गेला. परंतु त्यासंदर्भातले नियोजन सरकारकडून होऊ शकले नाही. सरकारी संस्थांमधल्याच जागा वाढवल्या गेल्या असत्या त्यात नवे अभ्यासक्रम जोडले गेले असते तर आज कौशल्यआधारित नोकऱ्याही उपलब्ध झाल्या असत्या आणि स्वयंरोजगारालाही चालना मिळू शकली असती.

### गावपातळीवर आयटीआय हवे

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. या देशातले ११० कोटी लोक मोबाईलचा रोज वापर करतात. तीस कोटी लोक रोज इंटरनेटवर काम करतात. तर देशातल्या सर्व उद्योगांचा ९० टक्के कारभार माहिती तंत्रज्ञानावर आधारित आहे अशावेळी या एकट्या क्षेत्राकरीता किती मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ लागत असेल याचा विचार करायला हवा. दुर्दैवाने आज उद्योगपूरक कौशल्यविकास राबवला जात नाही. म्हणूनच अगदी इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनादेखील योग्य ती रोजगाराची संधी मिळत नाही. अजूनही भारतातील पन्नास टक्के शासकीय कामे ई गव्हर्नन्स या संकल्पनेशी जोडली गेलेली नाहीत किंवा संगणक आधारित प्रशासन अस्तित्वात आलेले नाही. भविष्यातील या संभाव्य गरजा लक्षात घेऊन विज्ञान तंत्रज्ञानावर आधारित अनेक छोटे मोठे अभ्यासक्रम विकसित करता येऊ शकतात. केवळ राजकीय हेतू साध्य करण्याकरीता घोषणा करून उपयोगाचे नाही. तर प्रत्यक्षात समाजाची आणि एकूण देशविकासाची आवश्यकता लक्षात घेऊन काही ध्येय साध्य करण्याची गरज आहे. ज्या देशातला सत्तर टक्के समाज ग्रामीण भागात राहातो किंवा तिथे चाळीस टक्के जनता दारिद्र्य रेषेखाली आहे त्या देशात छोट्या स्वरुपातले म्हणजेच आयटीआयसारखे कौशल्य विकसित करणारे अभ्यासक्रम खूप मोलाचे ठरू शकतात. गावपातळीवर आयटीआय सुरु करता आले पाहिजे. तरच नोकऱ्या आणि स्वयंरोजगार या दोन्ही गोष्टींना चालना मिळू शकेल.